माहिती हवीय?

अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

□ दादासाहेब फाळके पुरस्कार केव्हा सुरू झाला? त्याचं स्वरूप कसं आहे? आतापर्यंत तो कोणाकोणाला मिळालाय?

— १९७०ला दादासाहेब फाळके यांच्या जन्मशताब्दीवर्षी हा पुरस्कार सुरू झाला. चित्रपटव्यवसायातील ज्यांचं योगदान भरीव आहे अशा कलावंताना हा पुरस्कार दिला जातो. १९७०ला देविकाराणीला हा पुरस्कार प्रथम मिळाला. आणि त्यानंतर निर्माते बी.एन.सरकार, अभिनेते पृथ्वीराज कपूर, संगीतकार पंकज मलिक, अभिनेत्री सुलोचना रूबी मायर्स, निर्माते बी. एन. रेडी, धीरेन गांगुली, गायिका-अभिनेत्री काननबाला, दिग्दर्शक नितिन बोस, अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक सोहराब मोदी, संगीतकार नौशाद, निर्माते-दिग्दर्शक एल. व्ही. प्रसाद, अभिनेत्री दुर्गा खोटे, निर्माते-दिग्दर्शक सत्यजीत रॉय, निर्माते दिग्दर्शक व्ही. शांताराम निर्माते बी नागी रेड्डी अभिनेता-निर्माता-दिग्दर्शक राज कपूर, अभिनेता अशोककुमार, पार्श्वगायिका लता मंगेशकर, ए. नागेश्वरराव आणि निर्माते-लेखक, दिग्दर्शक भालजी पेंढारकर, संगीतकार गायक भूपेन हजारिका, गीतकार मजरूह सुलतानपुरी, अभिनेता दिलीपकुमार, अभिनेता डॉ. राजकुमार, अभिनेता शिवाजी गणेशन, अभिनेता बी. आर. चोप्रा, हृषिकेश मुखर्जी, निर्माता-दिग्दर्शक यश चोप्रा, देव आनंद यांना या पारितोषिकाचा मान मिळाला आहे.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ आतापर्यंत कोणकोणत्या मराठी दिग्दर्शकांना हिंदी चित्रपटासाठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे? कोणत्या चित्रपटांसाठी? कोणत्या साली?

— व्ही. शांताराम यांना १९५७ साली *झनक झनक पायल बाजे*, सई परांजपे यांना १९८५ साली *स्पर्श*साठी फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे.

□ पुर्नजन्मावर आतापर्यंत किती चित्रपट निर्माण झाले?

— १९४९चा *महल* पुर्नजन्मावर आधारित पहिला चित्रपट. त्यानंतरचे पुनर्जन्माच्या कथेवरील ठळक चित्रपट म्हणजे *मधुमती* आणि *नाज*.


पी. एस. म्हापसेकर, म्हापसा-गोवा.

□ कुमकुमने कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची आणि सहनायिकेची भूमिका केली? या चित्रपटातील तिचे नायक कोण? तिचा शेवटचा चित्रपट कोणता?

— नरगीस व सज्जन यांनी नायक-नायिकेची भूमिका केलेल्या १९५२च्या *शीशात* एक नृत्य करून कुमकुम सर्वात प्रथम चित्रपटात आली आणि त्यानंतर *आरपार*मध्ये 'कभी आर कभी पार...' या गाण्यावर केलेल्या नृत्यामुळे ती प्रकाशात आली. त्यानं तर *बिंदिया, हसीना, हातीमताई की बेटी, हाऊस नं. ४४, राजकन्या, सती मदालसा, सोसायटी, मिस्टर अ‍ॅण्ड मिसेस ५५* या चित्रपटांत तिने कधी नृत्यं तर कधी लहान-सहान भूमिका केल्या. १९५६च्या *सीआयडी*त जॉनी वॉकरबरोबर एक ठळक भूमिका तिच्या वाट्याला आली. आणि त्यानंतर *बसंतबहार, भागमभाग, ढोला मारू, एक ही रास्ता, फंटूश* यासारख्या काही चित्रपटात तिने कधी नृत्यं तर कधी लहान-सहान भूमिका केल्या. *नया अंदाज*(जॉनी वॉकर), *समंदरी डाकू*(जॉनी वॉकर), *अंजली* (नायक विरहित भूमिका), *वारिस*(नायक विरहित भूमिका), *दुश्मन*(फक्त नृत्य), *जॉनी वॉकर*(नायक विरहित भूमिका), *मदर इंडिया* (राजेंद्रकुमार), *प्यासा*(जॉनी वॉकर), *उस्ताद* (रेहमान), *भला आदमी*(भगवानदादा), *घर संसार* (राजेंद्रकुमार), *कभी अंधेरा कभी उजाला*(नायकविरहित छोटी भूमिका), *मिस्टर कार्टून एम. ए.*(मेहमूद), *सच्चे का बोलबाला*(चंद्रशेखर), *सुवर्ण सुंदरी* (नायकविरहित भूमिका), *चार दिल चार राहे*(शम्मी कपूर), *कमांडर*(रंजन), *दो गुंडे*(अजित), *गोकूल का चोर*(रोमी), *उजाला*(राजकुमार), *शरारत* (किशोरकुमार), *बारूद*(सुधीर), *बम्बई की बिल्ली*(सुधीर), *दिल भी तेरा हम भी तेरे* (धर्मेंद्र), *दुनिया झुकती है*(आगा), *घर की लाज*(फिरोज खान), *कोहिनूर*(दिलीपकुमार), *नाचे नागीन बाजे बिन*(चंद्र शेखर), *तू नही और सही*(प्रदीपकुमार), *अपलम चपलम*(आय एस. जोहर), *सलाम मेमसाब*(सुबीराज), *शोला जो भडके*(भगवानदादा), *तेल मालिश बूट पॉलीश*(चंद्रशेखर), *किंगकाँग*(दारासिंग), *शेरखान*(कमलजीत), *सन ऑफ इंडिया*(कमलजीत), *बागी शहजादा* (किशोरकुमार), *गंगा की लहरें* (किशोरकुमार), *कव्वाली की रात* (कमलजीत). *मि. एक्स इन बॉम्बे*(किशोरकुमार). *एक सपेरा एक लुटेरा*(फिरोज खान), *श्रीमान फंटूश* (किशोरकुमार), *लाबेला* (सुजीतकुमार), *मैं वही हूं*(फिरोज खान), *स्मगलर*(संजीवकुमार), *आयेगा आनेवाला* (संजीवकुमार), *दुनिया नाचेगी* (किशोरकुमार), *दिलरूबा*(अजीत), *गुनाहगार* (संजीवकुमार), *लंबू इन हाँगकाँग* (सुजीतकुमार), *सब का उस्ताद* (सुजीतकुमार), *हाय मेरा दिल*(किशोरकुमार), *तेरी तलाश में*(शैलेशकुमार), *नई जिंदगी*(देवकुमार), *गीत*(सुजीतकुमार), *गुनाह और कानून*(संजीवकुमार), *वीर अमर सिंह राठोड*(देवकुमार), *आनबान*(सोम दत्त), *ललकार*(धर्मेंद्र), *धमकी*(विनोद खन्ना), *जलते बदन*(किरणकुमार), *बॉम्बे बाय नाईट*(संजीवकुमार) हे कुमकुमने नायिकेची तर कधी सहनायिकेची भूमिका केलेले चित्रपट. यापैकी *बॉम्बे बाय नाईट* तिचा शेवटचा चित्रपट.

अशोक परशुराम परब, ठाणे(पश्चिम).

□ रजनीकांतचे हिंदी चित्रपट कोणते?



चालबाजमध्ये श्रीदेवीसह रजनीकांत.

— अंधा कानून, गंगवा, जॉन जॉनी जनार्दन, मेरा अदालत, जुम्म की जंजीर, बेवफाई, गलियो का गुंडा, फौलादे मुक्का, हम नही झुकेंगे, महागुरू, वफादार, असली नकली, डाकू हसीना, इन्साफ कौन करेगा, उत्तर दक्षिण, चालबाज, तमाचा हे रजनीकांतचे ठळक हिंदी चित्रपट.